PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 2

# अरुण सांगोळे यांची कविता

**डॉ. अशोक नामदेव पळवेकर**

**अमरावती, महाराष्ट्र भारत**

अरुण सांगोळे हे खऱ्या अर्थाने भावकवी आहेत. त्यांच्या 'एका गोरज घडीला' (२००३) या काव्यसंग्रहात त्यांनी भावकविता, गीतरचना, अभंग, लावणी, ग़ज़ल, रुबाया इत्यादी वेगवेगळ्या काव्यप्रकारांतून लेखन केलेले आहे. परंतु भावकविता, गाणी, लावणी, अभंग, रुबाया यांच्या तुलनेत त्यांची 'ग़ज़ल' या काव्यप्रकारातील झेप वाखाणण्याजोगी आहे. म्हणून अरुण सांगोळे यांच्या कवितेचा वेध घेताना आधी त्यांच्या गझलरचनेचा परामर्श घेऊ; आणि नंतर त्या-त्या अनुषंगाने उर्वरित काव्यलेखनाची चर्चा करू.

१.

मराठी काव्यप्रांतात गझल हा एक प्रभावी काव्यप्रकार म्हणून ओळखला जातो. हा काव्यप्रकार अनेक अर्थाने अवघड असा काव्यप्रकार आहे. शिवाय तो तंत्रप्रधान आहे. त्याचे काव्यमूल्य, सौंदर्यमूल्य त्याच्या विशिष्ट तंत्रामधून वृद्धिंगत होत जाते. या काव्यप्रकारात भावाभिव्यक्तीचे चैतन्य हरवू न देता त्याचे तंत्र वापरावे लागते. याचा अर्थ ग़ज़ल लिहिताना केवळ ग़ज़लचे तंत्र समजले म्हणजे उत्तम ग़ज़ल लिहिता येईलच असे नाही. उत्तम ग़ज़ल लिहिण्यासाठी तंत्राबरोबरच ग़ज़लकाराचे 'कवी' असणेही तेवढ़ेच गरजेचे आहे. ग़ज़ल लिहिणारा उत्तम कवी असला आणि त्याचे ग़ज़लेच्या तंत्राचे आकलन चांगले असले की त्याच्या हातून जे लिहिले जाते ते त्याच्या मनातील भावनांचे प्रभावी आविष्करण ठरते. ग़ज़लरचनेसाठी भावनांचे प्रभावी आविष्करण तिच्या तंत्र आकलनाइतकेच महत्त्वाचे असते. त्याशिवाय प्रभावशाली ग़ज़ल लिहिलीच जाऊ शकत नाही. (२००६ : ६) अरुण सांगोळे यांनी ही जाणीव डोळसपणे जपलेली आहे. त्यामुळेच त्यांची गज़ल मराठी काव्यप्रांतात स्वतःचे स्थान व प्रभाव निर्माण करू शकली.

१९७५-८५ च्या दशकात ज्यांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला आणि ग़ज़ल या काव्यप्रकाराकडे अत्यंत चोखंदळ वृत्तीने पाहिले त्या कवींमध्ये रमण रणदिवे, संगीता जोशी, ज्योती बालिगा, प्रवीण दवणे ह्या कवींचा 'महाराष्ट्रातील आजचे चांगले ग़ज़लकार' असा उल्लेख कविश्रेष्ठ सुरेश भटांनी १९८२ साली केला होता. त्याच दरम्यान विदर्भाच्या भूमीतून प्रा. अरुण सांगोळे यांच्याकडून भटांनी चांगल्या ग़ज़लकाराची अपेक्षा केली होती. (२००३ : १३६) त्या अपेक्षेला अरुण सांगोळे यांनी तडा जाऊ दिला नाही. आजच्या घडीला ते महाराष्ट्रातील एक अव्वल दर्जाचे कवी-ग़ज़लकार आहेत. त्यांच्या 'एका गोरज घडीला' या काव्यसंग्रहातून त्याची प्रचिती येते. या काव्यसंग्रहात १०

रुबायांसह एकूण १०९ रचना समाविष्ट असून त्यातील जास्तीत जास्त म्हणजे जवळपास ७० रचना ग़ज़ल या काव्यप्रकारातील आहेत. उर्वरित रचना भावकविता, गीत, लावणी, अभंग आणि रुबाया या प्रकारातील आहेत. त्यांची एकूण संख्या ३९आहे. संग्रहातील सर्वच रचनांचे लेखन अक्षरगणवृत्त आणि मात्रावृत्तांतून केले गेले आहे.

२.

अरुण सांगोळे यांची वृत्ती अतिशय भावकोमल आणि उत्कट असून त्या वृत्तीचे वेगवेगळे पदर स्वतःचे भावजीवन, सामाजिक, राजकीय परिवेश, सांस्कृतिक भक्तिभाव आणि देशप्रेम यांच्या अनुषंगाने प्रेम, माणूसपण, जिव्हाळा, विफतता, हुरहुर, भक्ती इत्यादी अंगाने त्यांच्या काव्यरचनेतून अभिव्यक्त झालेले आहे. विफल प्रेमाच्या भोगाने सांगोळे यांचे अवघे भावविश्वच व्यापून गेले आहे. त्यामुळेच प्रेम आणि प्रेमाची विफलता यांची मांडणी करणाऱ्या ग़ज़लांची संख्या या संग्रहात सर्वाधिक आहे. त्या सर्व रचनांमधून प्रेमभावनेच्या आणि विफलतेच्या चढ-उतारांचे अत्यंत मोहक दर्शन घडते. प्रेमभावनेने ओथंबलेल्या व विफल प्रेमानुभवाने विव्हल झालेल्या भावाभिव्यक्तीचा ओथंब ज्या द्विपदींमधून झालेला आहे, त्या वेगवेगळ्या द्विपदींच्या एकत्र मांडणीतून त्यांच्या प्रेमजीवनाचा एक भावव्याकुळ प्रवासच उलगडत जातो. प्रेमाचे पहिले मोहरलेपण, गुंतत जाणारे श्वास, त्यातून आकारत जाणारी दोन जीवांची एकात्म वीण, काही कारणास्तव वाट्याला आलेली प्रेमाची भग्नता, विफल प्रेमाचा प्रत्यय आणि व्याकूळ करणारे आठवांचे कळ, एकमेकांच्या भावनांची वादळे, विफलतेमुळे आपापल्या ठिकाणी वाट्यास आलेले व्यथावर्तुळ आणि एकमेकांच्या सुख-दुःखांचे, विरहव्यथांचे अंदाज त्या प्रवासातील चढ-उतारांच्या अंगाने अधोरेखित होत जातात. त्यापैकी काही द्विपदी :

'वाटले कळेल मी आज ना उद्या तरी। कोण मी तुझा बरे? हे तुला कळेचना' (पृ. २५) 'दूर तू तीरावरी या डोळियांच्या। पापण्यांनी हाक मी मारीत आहे ! (पृ. २७) 'तुला बोलावतो आहे गडे हा चंद्र केव्हाचा। कधीचे चांदणे हाका तुला मारी तुझ्यासाठी' (पृ. ३४) 'ऐनवेळी जरी मोगरा टाळतो। तू मला माळशी मी तुला माळतो!' (पृ. १४) 'मी प्रेम व्यक्त केले त्याची सजा मिळाली। माझ्याच काळजाची शकले हजार झाली' (पृ. ४१) 'कुणी टाकले तेल आगीत ह्या इथे मी जळे अन् तिथे ती जळे!' (पृ. ४१) 'मनातल्या या नभात माझ्या घुमे तुझा चंद्र केशराचा। दवांतही चांदणे फुलावे असेच काही तुझ्याच आहे !' (पृ. ७५) 'झाले अबोल माझे गाणे तुला दिलेले। येती तुझे तरीही स्वर अंगणात माझ्या!'(पृ.७६) 'घातला आहे सडा मी आसवांचा। दुःख रांगोळी पुन्हा काढीत आहे ! (पृ.२७) ह्या द्विपदींमधील वेणीतल्या फुलांचा उन्हास सुगंध, डोळ्यांच्या तीरावर, पापण्यांची हाक, चंद्राचे बोलावणे, चांदण्यांच्या हाका, काळजाची शकले, केशराचा चंद्र, दवांतले चांदण्यांचे फुलणे, अंगणात येणारे स्वर, आसवांचा सडा, दुःखाने रांगोळी काढणे अशा मोहक शब्दकळेने प्रा. सांगोळे यांनी प्रेमभावनेच्या भावच्छटांना अर्थपूर्णता बहाल केली आहे. या प्रेमजाणिवेला भक्तीच्या कळा आहेत. त्या कळा- 'ज्या जगाने एक होऊ ना दिले आम्हा तरीही,। त्या जगाला दोन नावे गाळता आलीच नाही!(पृ.५६) अशा व्यथेतही एकात्मतेच्या पवित्र भासाने उमलून येतात. विरहाच्या दर एक क्षणाला हेच पवित्र भास जीवनाचे बळ पुरवित असतात. आणि- 'त्या रात्री जलधारांची मी रिमझिम ऐकत होतो। पण हाय सकाळी माझे कोरडेच अंगण होते!' (पृ.६०) -अशा विकल भासांनाही प्रत्यक्षात अनुभवताना- 'नेमकी इथेच कशी तहान तहानते। पाणी मिळेल येथे ... खोदले पाहिजे !' (पृ.४७) -असा जीवनाचा उभार आपल्या मनात पुनःपुन्हा जागवत ठेवला जातो. कारण- 'दुःखातल्या सुखांनी कुर्वाळिले मला। मी अर्थ जीवनाचा जाणून घेतला! (पृ. २६) म्हणूनच या कवितेत 'ज्याची व्यथा सुगंधी त्यानेच मोहरावे' ह्या वृत्तीचे ऋतू फुलून येतात.

अरुण सांगोळे यांची कविता वाचताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आंतरिक उमलणे सतत जाणवत राहते. त्यातून व्यथाविरहांचा दरवळ अंतःकरणाच्या गाभाऱ्यात सारखा घुमत राहतो. व्यावहारिक पातळीवर आलेल्या दाहक अनुभवांचे आंतरिकीकरण झाल्यानंतरच तो अनुभव शब्दात पाझरू देण्याची सांगोळे यांची भूमिका असल्यामुळे अनुभवातील जिवंततेचा भावप्रत्यय हे काव्य सहजच देऊन जाते. कारण अनुभवांचे आंतरिकीकरण होताना त्या अनुभवाची प्रत्यही कळ सर्व संवेदनांनी उमलली की त्या अनुभवाची प्रचिती आणि प्रतीतिही स्वाभाविक पातळीवर उतरते. ही स्वाभाविक पातळी अरुण सांगोळे यांच्या शब्दभावनेच्या एकात्म आणि घट्ट वीणेतून सहजपणे गाठली जाते. त्यामुळेच 'बी'मधून 'रोप' अंकुरावे तसेच शब्दातून त्यांच्या आंतरिक भावजीवनाची एक गंधार्थ लय त्यांच्या काळजातले ठसठसणे घेऊन ओथंबून येते. त्या लयीतील उदासीच्या भावविव्हल छटा मनाला इतक्या भावून जातात, की कवितेचे असे भावणे त्या कवितेच्या अभिजाततेची खूण दर्शविते. अशी कविता वाचताना वाचकाला त्या कवितेतून एक अनुभवसंवेदन साजिवंत होऊन झरत असल्याचा प्रत्यय येत राहतो. जसे- 'आटलो इतका असा की थक्क झाली लोचने। हे कळावे सागराला काय असते आटणे ! (पृ.३३) 'कातरवेळी काय करावे समजत नाही। आर्त चंद्रही हृदयामधला उगवत नाही' (पृ.४८) 'सोनचाफा लावुनी लागेचना। वेदनेचे झाड दारी लागले' (पृ. ५२) अजूनही एकटाच गातो सखी तिथे मोजतेच तारे। असा स्वराधीन देह होता कुणाविना रात संपवू मी ? हा प्रश्न कवीला अस्वस्थ करून टाकतो. कारण- 'जगण्याला या कारण असते ती असती तर !। दारालाही तोरण असते ती असती तर !' (पृ.१२) अशा प्रकारे काळजाच्या देठावर कळ उमलून आली की, सांगोळे यांच्या कवितेत वेगवेगळ्या भावना-विचारांचे अलवार ऋतू फुलून येतात, या कवितेत कधी उन्हाच्या झळांतून जीवाची काहिली वीणली जाते, कधी विरहव्यथेची व्यथाफुली दाटून येते, कधी स्वभोवतीच्या कराल वास्तवातील मोहरण्याची कांक्षा दुःखाने गदगदून जाते. कधी ही कविता काळोखावर उषेची शाल पांघरताना उजेडाच्या हाकांनी गहिवरून येते. कधी सामाजिक-राजकीय भानाने माणुसकीच्या प्रत्ययाचे जळते-उजळते तोरण होते. हे सर्व होत असताना चंद्र-चांदण्यांच्या उरातला आणि कळ्या-फुलांच्या अंतरंगातला भावकोवळा ऋतू या कवितेतील शब्द-भावलयीत आपली नजाकत सतत उमलवित ठेवतो. अर्थ-लावण्य आणि लय-लालित्य हे या कवितेचे वैभव आहे. हे वैभव मोहक आहे; आणि ही मोहकता या कवितेचा स्थायीभाव आहे.

३.

प्रेमभावनेचा आशय व्यक्त करणाऱ्या ग़ज़लांच्या तुलनेत सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या गज़लांची संख्या या संग्रहात कमी आहे. परंतु गुणात्मकदृष्ट्या त्या गज़लांचेही मोल अधिक आहे. सभोवतालचे सामाजिक-राजकीय वास्तव अतिशय कठोर आणि जीवघेणे असूनही माणसे हे सर्व कसे मुकाट्याने सहन करतात. त्यांना या वास्तवाच्या विरोधात पेटवता पेटवता पेटवणाराच विझून जातो. परंतु माणसे उभारून येत नाहीत; आणि जीवाची काहिली विणणाऱ्या उन्हातच पुन्हा पोळत जगणे पसंत केले जाते. याच वृत्तीमुळे सावलीचाही मग उन्हाशी करार होतो. या करारात व्यवस्था व तिच्या पाठीराख्यांचे हित अबाधित राखले जाते. त्याला कुठलीही बाधा पोहचत नाही. किंबहुना, बाधा पोहचूच नये यासाठी सर्व तजविज होत असते. पण त्याचे आकलन सामान्य जनांना होऊ दिले जात नाही. सामान्य जनांसाठी माणूसपणाचा गहिवर जपणाऱ्या या कवितेतील व्यथा म्हणूनच अतिशय बोलकी आहे.

'उगीच मी माणसे इथे पेटवीत होतो। अखेर छातीतला निखाराच गार झाला !' (पृ.१९) व्यवस्थेतील मिरासदारांच्या सर्व हालचालींवर कवी लक्ष ठेवून आहे. या तथाकथित सभ्य लोकांचे सारेच व्यवहार माणुसकीच्या विरोधातले आहेत, माणूसपण ओरबाडणारे आहे : 'ते विझून अंधाऱ्या आणती उजेडाला। कोपऱ्यात श्वासांच्या लावतो मशाली मी!'

(पृ.२०) कारण - 'राग ये मला माझा... चीड ये मला माझी | का उधार दु:खाच्या वाहतो पखाली मी? (पृ.२०) ही चीड घेऊन जगल्यामुळेच या व्यवस्थेच्या विरोधातला नकार नोंदवणे शक्य होते; आणि स्वत:लाही या साळसूद पालींच्या प्रतिष्ठित सरपटण्यापासून दूर ठेवता येते. या वृत्तीमुळे अशा प्रतिष्ठितांच्या दुनियेत आपल्याला थारा नाही, हे भान या कवितेत जपले गेले आहे. ही लाचारांची दुनिया आहे. 'मी यामुळे जगाच्या मागेच राहिलो | अंदाज घेतला जो तो नेमका चुके!' (पृ.३२) -असे वास्तव असले तरी, 'हे कुणापाशी तरी बोलले पाहिजे! | सत्य काय ते समोर आणले पाहिजे !' (पृ.४७) ही भूमिका स्वीकारली जाते. दबलेल्या श्वासांना बळ देण्याची ऊर्मी कवीच्या अंतरात आहे. म्हणूनच उजेडाला साद घालताना कोमेजलेल्या डोळ्यांतील आशावादित्व लोपून जाऊ नये यासाठी ही गझल - 'उगवणारा सूर्य तो असेलच आपुला | थोडे अजून सोसा, सोसले पाहिजे !' (पृ.४७) -असा धीर देते. या धीरानेही सामान्यांच्या जगण्याला उभारी येते. आणि- 'काळोखावर शाल उषेची पांघरतो मी ! | हृदयामधला सूर तेवढा जागवतो मी ! (पृ.५०) -असे माणूस जागविण्याचे ध्यासस्वप्न पालवायला लागते. माणसाच्या हृदयातला सूर जागविला की, त्याच्या अस्तित्वासाठी त्याला जाग यायला लागते. तेथून एक नवा संघर्ष जन्मास येतो आणि विझलेल्या मनात प्राण अंकुरायला लागतो. त्यासाठी एकेका माणसाला पेटवण्याचा व जागवण्याचा ध्यास या कवितेच्या उरात उमलून येतो. तेव्हा स्वाभाविकच- 'दूर हा काळोख झाला पाहिजे | सूर्य आता तो निघाला पाहिजे !' | 'कोणतीही योजना आखा तुम्ही | ह्या फुलाला गंध आला पाहिजे !' (पृ.६५) ही भूमिका अग्रहक्काने रेटली जाते. कारण जीवनाच्या सुगंधी मिठीसाठीच ह्या कवितेचा अट्टहास आहे ! त्यासाठीच तिचे उमलणे आणि फुलणे आहे. त्यासाठीच तिचे सर्वदूर मनामनात दरवळणे आहे.

४.

अरुण सांगोळे हे स्वभावत:च भावकवी असल्यामुळे एक नितांत सुंदर अर्थलावण्य त्यांच्या शब्दांना बिलगून येते; आणि मनाचे भाव झंकारून टाकणारी संगीतलय त्यातून उमलत जाते. त्यांच्या ग़ज़लरचनेतून तर हे जाणवत जातेच; परंतु गीतरचना, कविता, अभंगरचना आणि लावणी याही प्रकारांतून त्याचा सहजसुंदर प्रत्यय येतो. कविता या प्रकारातून व्यक्त झालेले भावलावण्य 'एका गोरज घडीला (पृ.९) 'आकाश' (ए.२९), 'दिवा' (पृ.४९), 'देह' (पृ.५६), 'नदी' (पृ.७४) या कवितांमधून अतिशय विलोभनीयतेने खुलून गेले आहे. त्याची प्रचिती याच कवितांमधील काही ओळींमधून सहजपणे येऊ शकते. जसे-

'तुझ्या स्वप्नील डोळ्यांत | लक्ष चांदणी उत्सव! | तुझ्या ओठांनी टिपले | माझ्या डोळ्यांतील दंव!' (पृ. ९) 'पहाटे उजाडून काळोख येता | प्रकाशास ये स्निग्धता कोवळी | तुझे नाव ओठांवरी आणले की | फुलू लागते अंतरीची कळी' (पृ.२९) 'मिणमिणत दिवा हा रात्र काढून देतो | घन गहन तरीही सूर्य टांगून येतो | -घडिभर बरसावे: मुग्ध आकाश व्हावे | मग मरणदिव्याचे गीत मातीत गावे !' (पृ.४९) 'पाण्यात मी पेरल्या तारकांचे कसे सांग झाले रुपेरी खडे | माझ्या गळे पूर डोळ्यांतुनी या समुद्रास गेले तडेच्या तडे वाळूत शोधू कसे शिंपले मी ? तुझ्या शंख हाती किती लागले | अंधारल्या खोल डोहात बाई कुणा शोधण्या भोवरे गुंतले!' (पृ.५६) 'जिथे संपते ही नदी आसवांची जिथे स्वप्न माहेर माझे असावे | उभा चंद्रघाटावरी मी कधीचा तरंगास माझ्या तिचे रंग यावे!' (पृ.७४) अशा काही काव्यरचनांमधून भावाभिव्यक्तीचा एक विलोभनीय प्रत्यय अनुभवास येत असला तरी त्यात काहीशा दुर्बोधतेचे अंश बेमालूमपणे भिनून गेले आहेत. परंतु ती दुर्बोधता भावलावण्याच्या तरलतेला कुठेही ओरबाडत नाही; किंवा त्या ओळीतील भावलावण्य भावण्याच्या प्रक्रियेतील अडसरही ठरत नाही. कवितेतील अर्थनिर्णयन काय असेल ते - ते काव्य समजण्याच्या पातळीवर महत्त्वाचे ठरते, परंतु भावलावण्याच्या पातळीवरही ही कविता मनाला चटकन मोहून टाकते, भावून टाकते!

अरुण सांगोळे यांच्या गीतरचना व लावणी या प्रकारात प्रासादिक भावकोमल शब्दकळा आणि शृंगारातील भावकोवळी प्रसन्नता या बाबींचा ओथंब असल्यामुळे त्यात दुर्बोधतेचे अंश नाहीत. 'आज ओठावरी' (पृ.१०), 'मी अशी' (पृ.१५), 'राधा' (पृ.१६), प्रियाविण' (पृ.१७), 'इतकी सुरेख तू की' (पृ.३१), 'सजणा'' (पृ.३८), 'नदीत घडा सोडता' (पृ.४०), 'शहर गुलाबी' (पृ.१), देश हा (पृ.६६), 'या टिपूर चांदण्यात' (पृ.६७) ही मनाच्या भावगर्भ तंद्रीतून निर्माण झालेली गाणी त्यातील हळूवार भावाने आपल्या मनाचा ठाव घेतात. मनाला हळुवार स्पर्श करणाऱ्या- 'आज ओठावरी गीत आले नवे ! | वेढून घे छेडून घे सूर माझ्यासवे ! | गंधरानातला | सोनचाफाच तू | कंच हिरवा असा | तूच माझा ऋतू! | रानीवनी माझ्यामनी सौरभाचे थवे! ' (पृ.१०) 'मी अशी झुरते मनी आणि हा चांदवा | सांजवेळी तो तरी जवळ माझ्या हवा | या निव्या डोळ्यात | बघ जरा डोहात... | पाण्यावर उतरलाय चांदण्यांचा थवा!' (पृ.१५) 'प्रियाविण... | जलधारांचे घेवुन तोरण | वणवण फिरतो श्रावण..' (पृ.१७) 'इतकी सुरेख तू की नुसते बघत रहावे!' | सौंदर्य हे असे की बेहोष चित्त व्हावे!' (पृ.३१) ह्या गीत ओळी, किंवा - 'राधेचे राधापण | विसरुनिया जाई क्षण' ही 'राधा' (पृ.१६) या गीतातील कल्पना, तसेच- 'दृष्ट लागावी असा या बांधवांचा देश हा! | हा कळ्यांचा हा फुलांचा पाकळ्यांचा देश हा! (पृ.६६) ही 'देश हा!' या गीतातील जाणीव मनाला प्रसन्नता बहाल करते.

लावणीतील शृंगाराची प्रसन्नताही अशीच मोहून टाकणारी असून त्यादृष्टीने - 'आकाशी इंद्रधनू' (पृ.११) आणि 'तुलाच केवळ कळले' (पृ.४२) ह्या दोन अभिव्यक्तीतील सांडलेला गुलाब शृंगारातील प्रसन्नतेचा दरवळ घेवूनच विखरलेला आहे.

अभंग रचनाप्रकारात 'शब्द' (पृ.५८), पाषाण' (पृ.७६) आणि 'ओंजळ' (पृ.२८) ह्या रचना अरुण सांगोळे यांच्या शब्द आणि भाव योजकतेच्या अपूर्व शब्द-भाव-शक्तीचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. 'रुबाया' (पृ.७९-८०) मध्येही त्यांचा आत्मरंग वेगवेगळ्या विभ्रमाचे भावचित्र उभे करतो.

अरुण सांगोळे यांच्या ग़ज़ल, गीत, कविता, अभंग ह्या सर्वच अभिव्यक्ती प्रकारांतून भावजाणिवेला साजेल अशा प्रतिमांची निर्मिती झालेली आहे. त्यातील: नक्षत्रांची दिंडी, चांदण्याचा तीळ, चंद्रथेंब, आर्त चंद्र, जलधारांचे तोरण, भर्जरी मेघ, दुःखाची पखाल, पूर्णिमेचा अंधार, पापण्यांची हाक, दुःखाची रांगोळी, स्वरांचे रान, शब्दांचे पक्षी, शब्दांचे रान, मनाचा कोकिळ, केशरी चंद्र, दिव्यांची सांज, तारकांचे पोळणे, उषेची शाल, काळजाचे फूल, वेदनेचे झाड, काजव्यांचा थवा, दिव्यांची रांगोळी, चांदण्यांचे पाय, मोराच्या पायातले नाचणारे दुःख, मेंदीचे हिरवे रान, ताऱ्यांची होडी, दवबिंदू, आसवांचे चाळ, हुंदक्यांची रानफुले, चंद्रघाट, मेघांचा उत्सव, उन्हाचा स्पर्श, चांदीच्या शुभ्रसरी, हिरवाकंच श्रावण ह्या काही महत्त्वाच्या अर्थगर्भ प्रतिमा त्यांच्या काव्यातील भावाभिव्यक्तीची श्रीमंती वाढविणाऱ्या आहेत.

नवकवितेत, खरेतर, प्रतिमांच्यामुळे दुर्बोधता निर्माण होते, असे बोलले जाते. परंतु सांगोळे यांनी वापरलेल्या प्रतिमांच्यामुळे त्यांच्या कवितेचे वैभव तर वाढलेच, पण आंतरिक भावाचे लेणेही त्यातून सहजगत्या कोरले गेले आहे. स्वाभाविकच कवितेतील भावाभिव्यक्तीची देदीप्यमानता त्या प्रतिमांच्यामुळे अधिक विलोभनीय झाली आहे!

५.

अशा प्रकारे अरुण सांगोळे यांची कविता आशय व अभिव्यक्ती या दृष्टीने अव्वल आहे. ग़ज़लेच्या बाबतीत आशय व अभिव्यक्तीच्या सोबतच रचनातंत्राचाही विचार महत्त्वाचा असतो. सांगोळे यांनी ग़ज़लेचे रचनातंत्र अत्यंत

समजुतदारीने आत्मसात केलेले आहे. त्यांना रचनातंत्राची सूक्ष्म जाण आहे. ग़ज़लरचनेची सर्व तंत्रे ते सहजतेने हाताळतात, हे त्यांच्या खालील वृत्तांतून बांधल्या गेलेल्या रचनांवरून स्पष्ट होते :

१) आनंदकंद : ओठ (पृ- १८), वारा (पृ- २८), सौंदर्य अप्सरेचे (पृ -३३), प्रेम (पृ- ४१), गजरा ( पृ- ४७), होळी (पृ- ५३), डाग (पृ-५४), माझ्यापरी (पृ-५५ ), हल्ली (पृ-६३), अंगण (पृ-७६) आणि आनंदकंद व रसना यांच्या संयोगाने लिहिलेल्या -संबंध (पृ- २४), दिवस (पृ- ४८) ह्या दोन गझला. २) मंजुघोषा : रूप (पृ-२१), दान (पृ-२७), खुशी (पृ- ४६), जखम (पृ-७३), शीळ (पृ-७५). ३) श्रीलीला : देखणेच हसणे हे! (पृ-११), तीर (पृ-७१), प्रहार (पृ-७७). ४) विद्युल्लता : अजूनही (पृ-२३), विश्वास (पृ-२६),सत्य (पृ-३२). ५) वियद्गंगा : दिंडी (पृ-३४), गोतावळा (पृ-५९), आणि ग्रह (पृ-६१) जीवकलिकाच्या संयोगाने. ६) हिरण्यकेशी : मनोगत (पृ-३७), मालकंस (पृ-६८), चर्चा (पृ-७५). ७) मेनका: साथ (पृ-३९), वेड (पृ-४४), चैन (पृ-६५) ८) स्त्रग्विणी : ऐनवेळी (पृ-१४), हात (पृ-३७). ९) भुजंगप्रयात स्वप्न (पृ.१८), अर्थ (पृ.३५). १०) सती-जलौघवेगा : करार (पृ-१९), उभार पृ.२२) ११) वीरलक्ष्मी : वादळ (पृ.३२), सोडल्यावर (पृ.६ ३ ) १२) पादाकुलक : खुलासा (पृ.३६), परी (पृ.३८).१३) अनलज्वाला: तारांगण ( पृ.१२), प्रेमळ ( पृ. ४५), कातरवेळी (पृ.४८), शाल (पृ.५०). १४) कलिंदनंदिनी : मशाल (पृ. १३), मनोमनी (पृ.५४) १५) कामिनी : घर (पृ.१४). १६) लज्जिता : हमी (पृ.१९), सुरा (पृ.६०). १७) रंगराग : राग (पृ.२०). १८) विभावरी : लबाड (पृ.६८). १९) वैखरी (रमल) : या प्रवासात (पृ.३०). २०) कालगंगा : सांजवेळी (पृ.३०). २१) देवप्रिया : मागणे मागू कुणा (पृ.३३), पाहिले जेव्हा तुला (पृ.५७). २२) व्योमगंगा : दोस्त हो! (पृ.३४), जिंदगी (पृ.५६). २३) मंदाकिनी : केव्हातरी (पृ-३५). २४) राधा: वाणी (पृ-३६). २५) सौदामिनी : आस (पृ-४१). २६) मृगाक्षी : कशासाठी (पृ-६४). २७) अरुणप्रभा : कात्रण (पृ-६०). २८) मालिबाला चाफ्यांची फुले (पृ-५२). २९) सुकेशी : मागणे (पृ-५७). ३०) सुकामिनी द्विरावृत्ता : कैफ (पृ.२५). आणि उपछंदातील : घाव (पृ-३९), हातोहात (पृ-२२) या क्षणी (पृ.४३), माणूस (पृ.४७) ह्या इतर काही ग़ज़ला. यावरून - आनंदकंद : १०, रसनेच्या संयोगाने + २ , मंजुघोषा : ५, अनलज्वाला : ४, श्रीलीला/विद्युल्लता/ वियद्गंगा /हिरण्यकेशी / मेनका : प्रत्येकी ३, स्त्रीग्विणी/ भुजंगप्रयात/सती-जलौघवेगा / वीरलक्ष्मी / पादाकुलक / कलिंदनंदिनी : प्रत्येकी २; आणि कामिनी / लज्जिता/देवप्रिया /व्योमगंगा / रंगराग / वैखरी / कालगंगा / मंदाकिनी / राधा / सौदामिनी / कलिंदरंजनी / अरुणप्रभा / मृगाक्षी / सुकेशी / विभावरी / मालिबाला / सुकामिनी द्विरावृत्ता : प्रत्येकी १ अशाप्रकारे रचना केलेली आहे, असे लक्षात येते.

अरुण सांगोळे यांच्या ग़ज़लरचनेत ग़ज़लेचा आकृतिबंध काटेकोरपणे सांभाळला गेला आहे. ग़ज़लेचे वृत्त (बहर), यमक(काफिया) आणि अन्त्ययमक (रफीद) या घटकांमुळे ग़ज़लेचा आकृतिबंध निश्चित होतो. ग़ज़लेमध्ये शेवटपर्यंत एकच वृत्त वापरले पाहिजे यावर कटाक्ष असतो. त्यामुळे ग़ज़ल शेवटपर्यंत एकाच वृत्तात लिहिली जाते. तिच्या पहिल्या शेराच्या दोन्ही ओळीत यमक आणि अन्त्ययमक येते. नंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीतच यमक व त्यानंतर अन्त्ययमक येते. ग़ज़लेतील अन्त्ययमक (रदीफ) ग़ज़ल संपेपर्यंत बदलत नाही. काही ग़ज़लांमध्ये अन्त्ययमक नसते. ती ग़ज़ल यमकप्रधान ग़ज़ल म्हणून संबोधिली जाते. (१९८७ : ८१-८९) अरुण सांगोळे यांच्या काही ग़ज़ला या प्रकारच्या आहेत. त्यापैकी विद्युल्लता व मंजुघोषा या वृत्तातील अनुक्रमे- विश्वास (पृ- २६) व शीळ (पृ- ७५) ह्या ग़ज़ला- 'दुःखातल्या सुखांनी कुर्वाळिले मला । मी अर्थ जीवनाचा जाणून घेतला!' । खांद्यावरी जगाचे मी दुःख घेतले । माझा प्रवास माझ्या नादात चालला! (पृ.२६) आणि- ' मी पहाटेच्या दवाने चिंब झाली । तोच कानी ओळखीची शीळ आली । पाहिले त्याने असे काही मला की, । अंतरी झाल्या गुलाबी हालचाली! (पृ. ७५) अशाच रदीफविरहित आहेत. ग़ज़लेतील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे स्वरचिन्ह किंवा अलामत. हे सर्व घटकअरुण सांगोळे यांनी त्यांच्या ग़ज़लरचनेत अत्यंत कुशलतेने सांभाळली आहेत. काही रचनांमध्ये मात्र एकाच

वृत्तात ग़ज़ल लिहिण्याऐवजी त्यांनी दोन वृत्तांचा वापर केला आहे. त्यांच्या 'संबंध' (पृ.२४) आणि 'दिवस' (पृ.४८) या ग़ज़लामध्ये त्यांनी आनंदकंद-रसना असा वृत्तसंयोग केला आहे. त्यापैकी 'दिवस' या ग़ज़लेत काहीसा रचनेच्या अंगाने प्रमाद जाणवतो. जसे या ग़ज़लेत आलेल्या शेराच्या दोन ओळी : क्षण एकेक सुरंगी रोमांच आणणारा। एकेक लाजरा क्षण जपण्यात रात्र गेली!' (पृ.४८) यात 'रसना' वृत्तात्तील पहिली ओळ 'आनंदकंद' वृत्तातील दुसरी ओळ त्या तुलनेत वाचनप्रक्रियेत काहीसा अडथळा निर्माण करते. परंतु, 'क्षण एकेक' या ऐवजी 'एकेक क्षण' असा शब्दक्रम बदलला तर तो अडथळा दूर होतो व उच्चाराच्या पातळीवरचे ठेक्याचे सौकर्य सहज होते. तसेच काही वृत्तरचनातील ग़ज़ललेखनात काहीशा अल्प प्रमाणात एका गुरू अक्षराऐवजी त्यांनी दोन लघु अक्षरांची सवलत घेतली आहे. एवढा एक लहानसा वृत्तदोष वगळला तर बाकी मोठ्या प्रमाणात त्यांची रचना निर्दोष आहे. काही ग़ज़ला ह्या प्रेयसीचे आत्मचिंतन मांडणाऱ्या असल्यामुळे त्यांना ग़ज़लसदृश नाट्यगीते संबोधणे उचित होईल. अशा ग़ज़लांमध्ये मंजुषोषा या वृत्तात लिहिलेल्या 'शीळ' (पृ.७५), 'खुशी' (पृ.४६) आणि विद्युल्लता या वृत्तात लिहिलेली 'अजूनही' (पृ.२३) या रचनांचा समावेश करता येईल.

अशारीतीने ग़ज़लरचनेसाठी अरुण सांगोळे यांनी तीच ती वृत्ते न वापरता विविध वृत्तांचा वापर केलेला आहे. ग़ज़ल रचनेच्या प्रांतात अरुण सांगोळे यांच्या ग़ज़लेचे स्थान तर निर्विवाद आहेच, त्यासोबतच त्यांच्या इतरही भावकवितेतील त्यांची शब्दकळा आणि तिचा डौल यासाठी आशय व अभिव्यक्तीच्या पातळीवर त्या कवितेचे वेगळेपण वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**ता. क.** : *( प्रस्तुत शोधनिबंध डॉ. राम पंडित यांनी संपादित केलेल्या 'मराठी ग़ज़ल : अरुण सांगोळे' या ग्रंथात प्रसिद्ध झालेला असून त्यात त्यांनी 'गझल' या शब्दासाठी 'ग़ज़ल' असे शब्दरुप वापरलेले आहे. माधव जूलियन ते रूप वापरायचे. सुरेश भट यांनी मात्र जाणीवपूर्वक 'गझल' हेच शब्दरुप योजिले आहे. प्रस्तुत लेखकाला 'गझल' हे शब्दरुप मान्य आहे.)*

## संदर्भ :

1. सांगोळे अरुण, २००३ : एका गोरज घडीला, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, (मूळ कवितासंग्रह)
2. पळवेकर अशोक नामदेव, २००६ : प्रस्तावना, युद्धयात्रा, सिद्धार्थ भगत, निनाद प्रकाशन, यवतमाळ
3. भट सुरेश, २००३ : २३.०८.१९८३ रोजीचे पत्र, सुरेश भट – एक झंझावात (संपादित ग्रंथ), अमरावती
4. भट सुरेश, १९८७ : गझलेची बाराखडी : रंग माझा वेगळा, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर